# पिवळं, केशरी, पांढरं असा कार्डांचा भेदभाव न करता सर्वांना रेशन व्यवस्था लागू करा! खात्यावर पैसे नको, रेशन पाहिजे!!

परवा एक आजी सांगत होती की **पूर्वी रेशनवर काय काय मिळायचं**. आजीनं एका एका वस्तूचं नाव सांगायला सुरुवात केली, **“गहू, तांदूळ, तेल, साखर, रॉकेल, डाळी, मीठ, माचीस, मुलांना कपडे, वह्या पण मिळायच्या. दिवाळीत तर रवा, मैदा, डालडा पण मिळायचा.”** आम्हाला प्रश्न पडला की पूर्वी सरकार एवढं सारं पुरवायचं तर आता का बंद केलं? पूर्वी एकच रेशनकार्ड होतं. कोणताही भेदभाव न करता सर्व जनतेला रेशनवर धान्य मिळत होतं. त्यानंतर **सरकारनं पिवळं, केशरी, पांढरं अशी तीन प्रकारची रेशन कार्डं आणली.**

## पण सरकारनं अशी वेगवेगळी कार्डं का आणली?

‘रेशनचं धान्य खऱ्या गरिबांपर्यंत पोहोचत नाही’ असं म्हणत सरकारनं गरिबांमध्ये भेद करत १९९६ साली पिवळं, केशरी, पांढरं अशी तीन रेशन कार्डं आणली. दारिद्र्यरेषेवरील लोकांसाठी रेशनवरील दर वाढवून बाजारभावाजवळ आणल्यानं ते रेशनवर जायचे बंद झाले. दारिद्र्यरेषेखालील बहुतांशी लोकांना कार्डच वाटलं गेलं नाही. सरकारच सांगतं की **७०.५% लोकांकडं एकतर कार्ड नाही किंवा असलं तर APL कार्ड आहे.** असं करून सरकारनं जास्तीत जास्त लोकांना रेशनच्या व्यवस्थेतून बाहेर काढलं.

**सरकारला अनुदान कमी करायचंय**

**BPL – दारिद्र्यरेषेखालील – गरीब**

**AAY – अंत्योदय – जास्त गरीब**

**APL – दारिद्र्यरेषेवरील – कमी गरीब**

## याचा लोकांवर काय परिणाम झाला?

लोकांना रेशनवर धान्य न दिल्यानं धान्याचा साठा प्रचंड म्हणजे ७०० लाख टन पर्यंत वाढला. त्यातील लाखो क्विंटल धान्य सडलं. पडून राहिलेलं धान्य सडलं, पण गरिबांपर्यंत पोहोचलं नाही. कुपोषण, भुकबळींची संख्या वाढली. यामुळे देशभरात आंदोलनं झाली. सर्वोच्च न्यायालयानं हस्तक्षेप करत प्रत्येक कुटुंबाला ३५ किलो स्वस्त धान्य द्यायला सांगितले. २०१३ ला अन्नसुरक्षा कायदा आला. कायद्यानुसार ७५% ग्रामीण आणि ५०% शहरी मिळून ६७% लोकांना रेशन दुकानांतून ५ किलो तांदूळ/गहू/बाजरी अनुक्रमे ३/२/१ रु. ने मिळायला पाहिजे.

## या कायद्याचं काय वास्तव आहे?



हा अन्नसुरक्षा कायदा अन्नसुरक्षा पुरवत नाही. एका प्रौढ व्यक्तीला १४ किलो, तर बालकाला ७ किलो धान्याची गरज असते. हा कायदा प्रती व्यक्ती ५ किलो धान्य देतो. त्यातही फक्त गहू आणि तांदूळ. खरं तर वेगवेगळ्या प्रकारे लोकांना रेशनमधून बाहेर काढायचे प्रयत्न चालू आहेत. केशरी कार्डवर अन्न व नागरी पुरवठ्याचा शिक्का नसल्याने, पॉस मशीनवर कुटुंबप्रमुखाचा अंगठा उमटत नसल्याने रेशनवर धान्य दिलं जात नाही. त्यात कुटुंबातील सर्वांनीच अंगठा देण्यासाठी जायचं असं म्हटल्यावर आणखी लोकं रेशनमधून बाहेर पडणार.

आता तर जे गहू, तांदूळ मिळत होतं तेही सरकार बंद करणार आहे. रेशन दुकानात स्वस्त धान्य देण्याऐवजी **‘थेट लाभ हस्तांतरण’** (**D**irect **B**enefit **T**ransfer – **डी.बी.टी.**) म्हणजेच खात्यावर पैसे देण्याचा प्रयोग सरकार करत आहे. अनुदान वेळेवर आणि आपल्याच खात्यावर जमा होईल की नाही याची काही खात्री नाही. अनेक लोकांच्या खात्यावर गॅसचे अनुदान अजूनही पोहोचत नाही. उद्या महागाई वाढली तरी अनुदान काही वाढणार नाही.

## जे रेशनवरून धान्य घेत नाहीत त्यांच्यावर काय परिणाम होईल?

डी.बी.टी. योजना लागू झाल्यावर महाराष्ट्रातील ५१,००० रेशन दुकानं बंद होणार. मग, सरकार शेतकऱ्यांकडून धान्य विकत घेणार नाही. शेतकऱ्यांना काही पिकांना जी थोडीफार सुरक्षितता (हमीभाव) मिळत होती, ती पण बंद होणार. शेतकऱ्यांचं नुकसान होणार आणि दुसरीकडे व्यापारी, साठेबाजी करणारे, मोठ्या कंपन्या यांच्या हातात सगळा धान्यबाजार जाणार. मग ज्या किंमतीला गहू, तांदूळ विकतील त्या किंमतीला आपल्याला खरेदी करावा लागणार. रेशन व्यवस्थेमुळे किंमतींवर नियंत्रण राहतं. खरं तर अन्नधान्यांचा साठेबाजार आणि काळाबाजार रोखण्यासाठीच सरकारने १९७० च्या दशकात रेशन व्यवस्था सुरू केली होती आणि आता तीच उद्ध्वस्त करत आहेत.

## पण आवश्यक असतानाही रेशन व्यवस्था का उद्ध्वस्त करत आहेत?

२०१८–१९ या वर्षी महाराष्ट्र सरकारने **‘अन्न व नागरी पुरवठा’ या खात्याच्या एकूण बजेटच्या ७३% म्हणजे ५,०९२ कोटी रुपये** इतका निधी खात्याला वितरित केला; पण या खात्याने **प्रत्यक्षात फक्त ३.५% इतकाच खर्च केला**. आहे ते तुटपुंजे अनुदानही सरकार खर्च करत नाही.

संविधानातील कलम ४७ नुसार देशातील प्रत्येक नागरिकाला पोषक अन्नधान्य मिळणं हा नागरिकाचा अधिकार आहे. प्रत्येक कुटुंबाला ३५ किलो धान्य त्यात तांदूळ, गहू, ज्वारी किंवा बाजरी, २ किलो डाळ, १ किलो तेल एवढ्या किमान गोष्टी देण्यासाठी सरकारला अजून १.२५ लाख कोटी रुपये लागतील. सरकार म्हणतं आमच्याकडे पैसा नाही. **गेल्या ४ वर्षांत उद्योगपतींना २२ लाख कोटी रुपयांची करमाफी आणि आतापर्यंत १९ लाख कोटी रुपयांची कर्जमाफी केली आहे.** याशिवाय हायवेसारख्या नको त्या ठिकाणी लाखो कोटी रुपये खर्च करत आहेत. यावरून स्पष्ट दिसतं की सरकारकडं भरपूर पैसा आहे. पण तो जनतेसाठी नाही. सरकारला जनतेला दिलं जाणारं अनुदान कमी करत बंदच करायचं आहे आणि जनतेच्या हक्काचा पैसा मूठभर उद्योगपतींच्या, कंपन्यांच्या खिशात टाकायचा आहे.

**मूठभर उद्योगपतींना दरवर्षी ५.५ लाख कोटी रु. करमाफी.**

**सर्वांना रेशनवर अन्नधान्य पुरवण्यासाठी फक्त ३ लाख कोटी रु. सुद्धा नाहीत?**



## जनता उपाशी आणि साठेबाज–कंपन्या तुपाशी!

उठसूट देशभक्तीच्या बाता मारणाऱ्या या सरकारला देशातील कष्टकरी लोकांशी काहीही देणंघेणं नाही. ‘जनता उपाशी आणि साठेबाज, व्यापारी, विदेशी कंपन्या तुपाशी’ हेच यांचं धोरण आहे. या धोरणांना कडाडून विरोध करत एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही! आपण आपली मागणी जोरदारपणे मागितली पाहिजे: **भाषण नको, रेशन पाहिजे!**

### मागण्या

- पिवळं, केशरी, पांढरं असा कार्डांचा भेदभाव न करता सर्वांना रेशन व्यवस्था लागू करा.
- डाळी, तेल, साखर यांसारख्या १३ जीवनावश्यक गोष्टी रेशन व्यवस्थेत सामील करा.
- रेशन व्यवस्थेऐवजी येऊ घातलेल्या थेट लाभ हस्तांतरणाचा (डी.बी.टी.) प्रयोग रद्द करा.

## लोकायत

**संपर्क पत्ता:** लोकायत, १२९ बी/२, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, एरंडवणे, पुणे – ४

*(या पत्त्यावर दर रविवारी संध्या. ५ ते ७:३० या वेळेत लोकायतची बैठक होते. बैठकीत आपलं स्वागत आहे.)*

अलका – 9067003838 ऋषिकेश – 9423507864 www.lokayat.org.in lokayat.india@gmail.com

lokayat.india lokayat.india @lokayat lokayatpune abhivyakti.pune KafilaOfficial

हे पत्रक अलका जोशी यांनी लोकायतसाठी बुधवार, दि. १३ फेब्रुवारी २०१९ रोजी पुणे येथे प्रकाशित केले.